जुलै ३१, २०२६



मोहरीदेवी खंडेलवाल कन्या विद्यालय येथे



## विद्यार्थीनींसाठी सायबर जनजागृती कार्यक्रम

अकोला : शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील Quick Heal Cyber Warrior Club तर्फे Cyber Shiksha for Cyber Suraksha अभियानांतर्गत आज दि. ३१ जुलै २०२६ रोजी मोहरीदेवी खंडेलवाल कन्या विद्यालय, डाबकी रोड, अकोला येथे इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थीनींसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. "My Data, My Responsibility" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये सुरक्षित डिजिटल सवयी विकसित करणे हा होता.

सायबर वॉरियर्स पूर्वा ताथे व तनुजा घोगरे यांनी सादरीकरण, प्रत्यक्ष उदाहरणे, प्रश्नमंजुषा आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमामध्ये फिशिंग, ओटीपी फसवणूक, डिजिटल अरेस्ट, यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षा, फोटो मॉर्फिंग, एआय व्हॉइस क्लोनिंग तसेच सुरक्षित ऑनलाइन व्यवहार याबाबत माहिती देण्यात आली. हा कार्यक्रम श्रीमती दीप्ती पेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रसिका वाजगे यांनी विद्यार्थिनींना डिजिटल माध्यमांचा सुरक्षित व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले.

Quick Heal Cyber Warrior Club, Shankarlal Khandelwal College, Akola हा विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली चालणारा सायबर जनजागृती उपक्रम असून तो Quick Heal Foundation, Pune व Maharashtra Cyber यांच्या सहकार्याने राबविण्यात येतो. या अभियानाला अनुपमा कटकर, अध्यक्षा, Quick Heal Foundation तसेच अजय शिर्के, Associate Director, Quick Heal Foundation, Pune यांचे मार्गदर्शन लाभत आहे.